महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ

४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१

Website - www.msbsd.edu.in Email - secretary@msbsde.edu.in दुरध्वनी क्र. ०२२-२६४७४४३५

तात्काळ

अतिमहत्वाचे

पत्र क्र. का.क्र. १४/मान्यता/२०२२/ ९३८

दिनांक: २४.०५.२०२२.

प्रति,

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय (सर्व)

विषय: महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळास विविध सेवांसाठी देय सर्व शुल्क मंडळाच्या बँक खाती जमा करणेबाबत.

संदर्भ:

१. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, दि. २०.०१.२०२२, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ - महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१

१. संदर्भीय अधिनियम क्र. ०१ अन्वये राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा यानुसार कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उद्योजकता शिक्षण व महाराष्ट्र राज्यातील इतर कौशल्य पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींचे नियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक इतर बाबींसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ स्थापन करण्यासाठी व विधीसंस्थापित करण्यासाठी अधिनियम, २०२१ निर्गमित करण्यात आला आहे.

२. उपरोक्त अधिनियमातील प्रकरण तीन मध्ये नियामक परिषदेचे व मंडळाचे अधिकार व कर्तव्ये देण्यात आले आहेत. अधिनियमातील कलम २५ अन्वये मंडळाचे अधिकार व कर्तव्ये देण्यात आले आहेत. पोटकलम (५) नुसार सुरक्षा ठेव, संलग्नता, नाव नोंदणी, सल्ला, स्वायत्तता प्रदान करणे, सममूल्यता देणे यांसह मूल्यनिर्धारण, परीक्षा आणि इतर सेवा यांसाठी आणि मंडळाने पुरविलेल्या सल्लाविषयक सेवांसाठी, मंडळास योग्य वाटेल असे शुल्क व शास्ती आणि इतर आकार निर्धारित करणे, विनिर्दिष्ट करणे आणि विद्यार्थी व इतर कोणतीही व्यक्ती, संस्था, उद्योग किंवा निगम निकाय यांच्याकडून त्याचे प्रदान स्वीकारणे यास मान्यता देण्यात आली आहे.

३. उपरोक्त अधिनियमातील प्रकरण पाच मध्ये निधी, वित्तव्यवस्था, लेखा व लेखापरीक्षा संबंधी तरतुदी देण्यात आल्या आहेत. अधिनियमातील कलम ४१, पोटकलम (१) नुसार मंडळाचा, स्वत:चा असा एक निधी असेल अशी तरतुद आहे व निधीचे संभाव्य स्रोत नमुद करण्यात आले आहेत ज्यात विविध शुल्कांचा समावेश आहे. सदर जमा शुल्कांतुनच प्रवेश, प्रशिक्षण व्यवस्थापन, बैठका, संशोधन व विकास, परीक्षा व अनुषांगिक खर्च भागविणे निर्देशित आहे.

४. सबब सन २०२२-२३ या सत्राकरिता खालील नमूद सर्व सेवा शुल्क HDFC BANK मध्ये मंडळाच्या बचत बँक खात्यात जमा करण्यात यावेत.तरी याबाबतच्या सूचना सर्व संस्थांना आपणांकडून तात्काळ देण्यात याव्यात.

| अ.क्र. | विविध शुल्क |
|---|---|
| १. | नविन अभ्यासक्रमासाठी मान्यता अथवा अस्तित्वात असलेल्या तुकडीत वाढ करण्यासाठी<br>१) अर्ज शुल्क<br>२) प्रक्रिया शुल्क(प्रती अभ्यासक्रमप्रती तुकडी)<br>अ) नियमित शुल्क<br>ब) विलंब शुल्क ( १० टक्के अतिरिक्त) |
| २. | तात्पुरती मान्यता एक वर्षासाठी मुदतवाढ (नुतनीकरण) प्रक्रिया शुल्क (प्रती अभ्यासक्रम प्रती तुकडी)<br>१) नियमित शुल्क<br>२) विलंब शुल्क ( १० टक्के अतिरिक्त) |
| ३. | अभ्यासक्रम जागा स्थलांतरण (प्रती अभ्यासक्रम प्रती तुकडी) |
| ४ | पुढील आदेशापर्यंत स्थायी संल्गनता.<br>१) जुने अभ्यासक्रम - २००२-०३ मधील किंवा त्यापूर्वीचे<br>२) नविन अभ्यासक्रम - २००३-०४ मधील व त्यापुढील |
| ५. | निरीक्षण शुल्क |
| ६. | अनामत रक्कम( चलनाने किंवा बँक गॅरंटी स्वरुपात स्वीकारण्यात येऊ नये) |
| ७. | विद्यार्थी नोंदणी शुल्क (प्रति विद्यार्थी) |
| ८. | परीक्षा शुल्क (प्रति विद्यार्थी) १) नियमित शुल्कासह २) विलंब शुल्कासह |
| ९. | व्दितीय / दुय्यम प्रमाणपत्र |
| १०. | गुणपत्रिकेची अतिरिक्त / दुय्यम प्रत |
| ११. | उत्तरपत्रिकेवरील मार्कांची पुर्नतपासणी प्रती विषय |
| १२. | उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (प्रती विषय) |
| १३. | उत्तरपत्रिकेची पुर्नपडताळणी (प्रती विषय) |

५. तसेच खालील नमूद बँकेच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेत रक्कम जमा केली असल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही.याची नोंद घेण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधित संस्थांना कळविण्यात यावे.

| | |
|---|---|
| ACCOUNT HOLDER NAME : | MSBSVET |
| BANK : | HDFC BANK |
| BRANCH: | KALHER BHIWANDI |
| **ACCOUNT NUMBER:** | **501 00 506 165 732** |
| **IFSC:** | **HDFC0006198** |

(के.डी.शिंदे)
सचिव

प्रत: माहितीसाठी
१. मा.प्रधान सचिव,कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२. मा.संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई-१

प्रत-माहिती व पुढील कार्यवाही साठी.
१. मा.सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/नागपूर.
२. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)
३. सर्व मान्यताप्राप्त संस्था व इच्छुक संस्था.
४. लेखाविभाग
५. सर्व विभाग
६. निवडनस्ती